सं.फौ.प्र.क्र.११५०/२०२२
दत्तात्रय/सुरेश
निशाणी – ३५

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की –
माझे नाव: योगीता शिवाजी सांळूखे,
वयः ४१ वर्षे, व्यवसायः शाखा प्रमुख,
निवासस्थान: सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा गुणवरे,
ता. फलटण, जि. सातारा.

**फिर्यादीतर्फे शपथेवर सरतपासणी श्री. यु. व्ही. कदम वकील यांच्यामार्फत**

मला आज साक्षकामी न्यायालयाचा साक्षीसमन्स प्राप्त झाला आहे. आमच्या बँकेमध्ये दत्तात्रय सखाराम भोसले यांचे बचत खाते आहे. दिनांक ११/०९/२०२० रोजी दत्तात्रय भोसले यांनी सुरेश माणीक मोरे यांच्या सेंट्रल बँकच्या खात्यामध्ये रुपये २ लाख एन.ई.एफ.टी. द्वारे रक्कम वर्ग केली होती. ते दर्शविण्याकरीता मी आज न्यायालयात आर.टी.जी.एस. फॉर्मची पडताळलेली प्रत व वीड्रावल स्लीपची पडताळलेली प्रत दाखल केली आहे. मी आज न्यायालयात त्या फॉर्मची व वीड्रावल स्लीपची मुळ प्रत सोबत आणलेली आहे. सदर मुळ प्रतींवरुनच सदरच्या पडताळलेल्या प्रती काढण्यात आलेल्या आहेत. आता मला आर.टी.जी.एस. फॉर्मची पडताळलेली प्रत दाखविण्यात आली. त्यावर खातेदार दत्तात्रय भोसले, बॅकेचे लेखणीक कापसे व शाखा प्रमुख अब्दागीरे यांच्या सह्या आहेत. म्हणून त्यास **नि.क्र.३६** देण्यात आले. आता मला अभिलेखावरील वीड्रावल स्लीपची पडताळलेली प्रत दाखविण्यात आली. त्यावर खातेदार दत्तात्रय भोसले यांची सही आहे. म्हणून त्यास **नि.क्र.३७** देण्यात आले.

२. तसेच मी दत्तात्रय भोसले यांच्या खात्याचे अकाऊंट स्टेटमेंन्ट आज न्यायालयात दाखल केलेले आहे. दिनांक ११/०९/२०२० ला दत्तात्रय भोसले यांच्या खात्यावरुन सुरेश मोरे यांच्या खात्यावर रक्कम रुपये २ लाख वर्ग झाले आहेत. आता मला सदरचे अकाऊंट स्टेटमेंन्ट दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे व आमच्या बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. म्हणून त्यास **नि.क्र.३८** देण्यात आले.

**आरोपीतर्फे उलटतपास श्री. जे. एम. मेटकरी वकील यांच्यामार्फत**

३. मी गुणवरे शाखेमध्ये नोव्हेंबर २०२३ पासुन कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ११/०९/२०२० रोजी मी त्या शाखेमध्ये कार्यरत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे जो काही व्यवहार झाला आहे त्याबाबत मला वैयक्तीक माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे

की, दिनांक ०९/०९/२०२० रोजी दत्तात्रय भोसले यांच्या खात्यातुन रक्कम रुपये २ लाख सुरेश मोरे यांच्या खात्यात वर्ग झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला काहीही माहीती नसतांना मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण<br>फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्विकृत<br>माझ्या समक्ष

ठिकाण – फलटण<br>दिनांक – २३/०८/२०२४

(आर. डी. भुयारकर)<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, फलटण